# श्री. नारायण पांडुरंग कोहाड

सेवक क्र. २६८ मु. राणी दुर्गावती नगर, नागपूर

लग्न झाल्यापासून पाच वर्षे मला मूलबाळ झाले नाही. त्याकरिता मी डॉक्टरांकडून उपचार करुन घेतला पण काहीच फायदा झाला नाही. शेवटी मी जाणत्याकडून उपचार केले. जाणत्याने त्याकरिता लिंबू व डुकराचे हाड आणले. तो अमावस्या व पौर्णिमेला आपले प्रयत्न करीत असे. तरी पण काहीच फायदा झाला नाही. यात माझे खूप पैसे खर्च झालेत. त्यामुळे मी बरबाद झालो.

एकदा श्री. शंकरराव धार्मिक यांच्या पत्नीशी माझ्या पत्नीचा परिचय झाला. शंकररावजी धार्मिक हे एका भगवंताला मानत असत. त्यांच्या पत्नीने एका भगवंताचा परिचय करुन दिला व महानत्यागी बाबा जुमदेवजींचे मार्गदर्शन सांगितले. ते मार्गदर्शन पत्नीने मला घरी येऊन सांगितले. हा मार्ग स्वीकारण्याकरिता ह्या मार्गात घरात सर्वांचेच एकमत होणे आवश्यक असते. तसेच झरी होणारी अने देवांची पुजाही बंद करावी लागते. आम्ही यावर सविस्तर विचार करुन हा मार्ग स्वीकारण्याचे ठरविले. श्री. शंकरराव धार्मिकांना सोबत घेऊन आम्ही बाबांच्या निवासस्थानी गेलो. बाबांनी ह्या मार्गावर येण्याचे कारण विचारले. मी त्यांना सर्व हकीगत सविस्तर सांगितली. बाबांनी आम्हाला बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य दिले. ते कार्य आम्ही काटेकोरपणे व त्यागाने पूर्ण केले. त्यामुळे आम्हाला योग मिळाला व पूर्ण समाधान मिळाले.

एक दिवस गट क्र. चारमध्ये बाबांच्या उपस्थितीत भगवतकार्याची बैठक चालू असताना आमच्या गट क्र. चारच्या सेवकांना बँकेतून कर्ज मिळत नाही अशी तक्रार मी बाबांकडे केली. तक्रार ऐकून नंतर बाबांना खूप रडायला आले. बाबा मला म्हणाले, जर तुम्ही सभासदाच्या कर्जवसुलीची जबाबदारी घेत असाल तर तुमच्या जबाबदारीवर कर्ज देण्यास सांगतो. नंतर माझ्या जबाबदारीवर काही सेवकांना बँकेतून कर्ज देण्यात आले. काही सेवकांनी कर्ज घेऊन परतफेड केली नाही त्यामुळे मी बाबांच्या शब्दात फसलो. मी बाबांचे मन दुखावले. मी खोटा पण पडलो. त्याचे प्रायश्चित म्हणून मला माझ्या पत्नीला गमवावे लागले. ही चूक माझ्या लक्षात आल्यावर बाबांकडे जाऊन त्या शब्दाची क्षमा मागितली.

नंतर मी दुसरे कुटुंब केले. तेव्हापासून मला भरपूर योग मिळाला. संसारात

परिपूर्ण समाधान **मिळाले.** आम्ही **आपले जीवन** आनंदात घालवीत आहोत. **बाबांचे** शब्द हे स्वयं परमेश्वराचे **शब्द** आहेत. त्यांनी मी जीवनात विसरणार नाही असे **सत्य** वचन देऊन माझे **सत्य अनुभव** संपवतो.

* * * * *